**प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य ना।ग।पू।**

**रिपत्रक**

क्र कक्ष-१६/आगि/मुवसं(सर्व)/प्र.क्र.१४१(१२-१३)/९२९/१३-१४
नागपूर-४४० ००१, दिनांक ०६/०५/२०१३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा) (सर्व)
------ ----------वनवृत्त,

विषय :- अकृषक न झालेल्या जागेवर स्थापित आरागिरणीचे परवाने नुतनीकरण न करण्याबाबत

संदर्भ :-१. शासन अधिसुचना क्र.एसडब्ल्युएम-१०९०/सीआर-५७/फ-६, दिनांक २८/८/१९९१
२. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१६/सॉमिल/१३२५/९१-९२, दिनांक २९/१०/१९९१
३. शासन अधिसुचना क्र.एसडब्ल्युएम-१०९०/सीआर-५७/फ-६, दिनांक ६/११/२००१
४. या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-१६/आगि/मुवसं(सर्व)/प्र.क्र.१४१/१२-१३/९७४, दिनांक २९/१/२०१३
५. शासन पत्र क्रमांक विपताप्रक्र-०२/२०१३/प्र.क्र.६०/फ-६, दिनांक २२/३/२०१३

विषयांकित प्रकरणी, आरागिरणी परवान्याचे हस्तांतर, आरागिरणीचे स्थानांतरणाबाबत संदर्भित क्र. १ व ३ अन्वये शासन अधिसुचना जारी करण्यात आली. सदर अधिसुचनेच्या अनुषंगाने एका वनवृत्तातून दुस-या वनवृत्तात तसेच एका वनविभागामधून दुस-या वनविभागामध्ये आरागिरणीचे स्थानांतरण व हस्तांतरण करण्यात येते. या संदर्भात या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्रमांक २ व ४ अन्वये मार्गदर्शक सुचना तसेच विहित प्रपत्र देण्यात आलेले आहेत. त्यात आरागिरणी शेतात पुर्नःस्थापन करावयाची असल्यास शेती वा शेतीचा भाग बीगरशेती [Non-Agriculture] करण्यात आला आहे काय? असल्यास आदेश क्रमांक व दिनांक सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील सन २०१३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषद तारांकित प्रश्न क्रमांक ३७००१ उपस्थित करण्यात आला. त्यानुसार शासनास उत्तर सादर करण्यात आले शासन संदर्भित पत्र क्र. ५ अन्वये, *“ज्या जागा अकृषक नसतील त्या ठिकाणी स्थापि असणा-या सर्व परवाना प्राप्त आरागिरण्यांचे नुतनीकरण ज्या जागा जोपर्यंत अकृषक ह नाही तोपर्यंत करण्यात येवू नये. तसेच या जागा जोपर्यंत अकृषक होणार नाहीत तोपर्यंत आरागिरण्या सुरू राहणार नाहीत”* असे शासन निर्देश आहेत. तरी सदर शासन निर्देशा आपले स्तरावर योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी व त्याबाबत अनुपालन अहवा कार्यालयास **सत्वर** सादर करावा.

तसेच असेही कळविण्यात येत आहे की, यापुढे वृत्तस्तरावरून होणा-या आरा स्थानांतरणाबाबत कार्यवाही करतांना आरागिरणीची नियोजित जागा अकृषक अस

आरागिरणीचे स्थानांतरण व हस्तांतरण करण्यात येवू नये. व या कार्यालयाकडे आरागिरणीचे पुनर्स्थानिश्चयनाबाबत प्रस्ताव सादर करतांना आरागिरणीची नियोजित जागा अकृषक असल्याखेरीज प्रस्ताव सादर करण्यात येणार नाही याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी. तरी याबाबत आपले अधिनस्त संबंधीत उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/उप विभागीय वन अधिकारी (स्वतंत्र) यांना सुध्दा आपलेस्तरावरून अवगत करावे, ही विनंती.

**प्रमुवसं ( वन बल प्रमुख) यांचेकडून मान्य मसूदा**

प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर करिता